# प्रकरण दुसरे

# ‘समिधा’ची वाङ्मयीन चिकित्सा

# प्रकरण दुसरे
# ‘समिधा’ ची वाङ्मयीन चिकित्सा

**प्रास्ताविक**

**१. ‘कादंबरी’ या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप व व्याख्या**

१.१ कादंबरीची व्याख्या

१.२ कादंबरीचे घटक

१.२.१ कथानक

१.२.२ व्यक्तिचित्रण

१.२.३ वातावरण

१.२.४ भाषाशैली

१.२.५ निवेदनशैली

**२. ‘समिधा’ कादंबरीचे कथानक**

**३. ‘समिधा’ मधील व्यक्तिरेखा**

३.१ ‘समिधा’ मधील मुख्य व्यक्तिरेखा

३.२ ‘समिधा’ मधील गौण व्यक्तिरेखा

**४. व्यक्तिरेखाविषयी अभ्यासकांची मते**

**५. ‘समिधा’ मधील वातावरण**

**६. ‘समिधा’ मधील भाषाशैली**

६.१ म्हणी

६.२ वाक्प्रचार

६.३ अलंकारिक वाक्ये

६.४ ‘समिधा’मधील संवाद

६.५ ‘समिधा’मधील शब्दयोजना

**समारोप**

----

# प्रकरण दुसरे
# 'समिधा'ची वाङ्मयीन चिकित्सा

## प्रस्ताविक

मराठी साहित्याच्या दालनात स्वातंत्र्योत्तर काळात जो एक वाङ्मयीन प्रवाह अस्तित्वात आला तो म्हणजे दलित साहित्य. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलित समाज शिक्षणाकडे वळला आणि शहाणा झाला. त्याला आत्मभान आले. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची त्यांना जाणीव झाली. या जाणिवेला वाचा फोडण्याकरीता, आपले दु:ख वेशीवर टांगण्याकरीता त्यांनी लेखन हे हत्यार वापरले व त्यातूनच त्यांनी साहित्य निर्मितीला सुरुवात केली. यापैकीच 'दलित कादंबरी' हा एक वाङ्मयप्रकार १९६० नंतरच्या काळात उदयास आला. दलित साहित्यिकांनी जे अनुभवले, सोसले त्याचे चित्रण आपल्या कादंबऱ्यामधून केल्याचे दिसते.

दलित लेखकांनी तर आपले वास्तव जीवन मांडण्याचा प्रयत्न केलाच परंतु काही दलितेतर लेखकांनीही दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांनी दलितांचे जीवन पाहिले, ऐकले व आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला.

रणजित देसाई यांनी 'स्वामी' व 'श्रीमान योगी' सारख्या ऐतिहासिक कलाकृती निर्माण केल्यानंतर दलितांचे जीवन जवळून पाहिले,ऐकले व अनुभवले. त्यातूनच त्यांनी बेरडांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी 'बारी' (१९५९) ही पहिली कादंबरी लिहिली. त्यानंतर दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी 'समिधा' ही कादंबरी लिहिली. रणजित देसाई यांनी दलितांच्या जीवनावर काही कथाही लिहिल्या आहेत. त्यापैकी या प्रकरणात 'समिधा' या कादंबरीची वाङ्मयीन

चिकित्सा करावयाची आहे. ही चिकित्सा करत असताना कथानक, व्यक्तिचित्रणे, वातावरण आणि भाषाशैली या कादंबरीच्या घटकांच्या अनुषंगाने अभ्यास करावयाचे ठरविले आहे.

रणजित देसाई यांनी लिहिलेल्या 'समिधा' या कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील दलितांचे जीवन रेखाटल्याचे दिसते. त्यामुळे ही कादंबरी ग्रामीण व दलित सीमारेषेवरील कादंबरी वाटते. या कादंबरीतून लेखकाने दलित व सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण केले आहे. या संघर्षाचे चित्रण करताना कादंबरीचे कथानक हे घटनेवर आधारलेले आहे. तसेच त्यामध्ये मुख्य व गौण अशी पात्रांची निर्मिती लेखकाने केली आहे. तसेच निवेदनाची भाषा ग्रामीण आहे. वाक्प्रचार, म्हणी, चटकदार संवाद, व्यक्ती आणि प्रसंगानुरुप शब्दयोजना ही 'समिधा' मधील भाषेची वैशिष्ट्ये आहेत.

कादंबरीला आवश्यक असणारे घटक लेखकाने वापरले आहेत. या घटकांशिवाय कादंबरी पूर्ण होऊ शकत नाही. म्हणूनच लेखकाने कादंबरीची निर्मिती करताना जे घटक वापरले आहेत त्या घटकावरून तिची वाङ्मयीन चिकित्सा करावयाची आहे.

## १) 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप :

साहित्यक्षेत्रात मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये पाहिले किंवा वाचले तर असे जाणवते की कविता या वाङ्मयप्रकाराला प्राचीन अशी परंपरा आहे. परंतु 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराला अशी परंपरा नसल्याचे दिसून येते. कादंबरी हा वाङ्मय प्रकार इंग्रजी साहित्यात जन्माला आला. अगदी पूर्वीपासून गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ह्या गोष्टी मानव मनोरंजनाकरीता करत आलेला दिसून येते.

१८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या ग्रंथात 'कादंबरी' या शब्दाचे अर्थ देताना 'एक कल्पित कथा' असा अर्थ दिला आहे. यावरून प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी 'एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला 'कादंबरी' हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रुढ असावे.' असा जो तर्क केला आहे तो खरा असावा. इंग्रजीत 'नॉव्हेल' तर कधी 'फिक्शन' हा शब्द वापरला जातो. हिन्दी कादंबरीला 'उपन्यास' म्हणतात. उपन्यास या शब्दाचा अर्थ 'जवळ ठेवणे' अथवा 'समोर मांडणे' असा आहे.

**कादंबरीची व्याख्या :**

'सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्राची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जिवित घटना यांचे गोष्टीरुपाने वर्णन करून कलावंताची प्राप्ती करवून जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग म्हणजे कादंबरी.'[१] अशी व्याख्या 'मराठी कादंबरी, तंत्र आणि विकास' या पुस्तकात आहे. ''कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कथानकाद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी कहाणी म्हणजे कादंबरी.''[२] या व्याख्येत कुलकर्णी यांनी कथानकाचा केवळ विचार केला असला तरी, कादंबरीत मानवी जीवनाचे सविस्तर दर्शन घडविले जाते. हे सांगितले आहे. तसेच भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्यकृती असते. कादंबरी ह्या सर्व गोष्टीमुळे एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या पोट समूहाचे, पोटसंस्कृतीचे तपशीलासह दर्शन घडवलेले असते. काळाचा

किंवा समाजाचा छंद घेतलेलाअसतो. आशयसूत्रे बळकट असतात, पात्रे सलग उभी राहतात.''[३]

या व्याख्यांपैकी नेमाड्यांनी जे घटक मानले आहेत ते आशयसूत्रे, पात्रे, प्रसंग, प्रदीर्घ अवकाश इ. घटक हेच कादंबरीचे स्वरुप आणि अधिक नेमकेपणाने स्पष्ट करणारे आहेत. कारण कादंबरीत प्रसंगाच्या परिपूर्ण चित्रणाची आवश्यकता असते. परंतु इतर बाबींपेक्षा आशयसूत्रांची विविधता ही कादंबरीची श्रेष्ठता वाढविण्यासाठी आवश्यक असलेली बाब आहे. परंतु कादंबरी म्हणजे आधुनिक युगाचे चित्रण झाले. आशय, मांडणी व ठेवण या गोष्टींचा विचार कादंबरीने केला. शेवटी मला असे वाटते की, ''मानवी जीवनाचे दर्शन घडविण्याकरीता सत्य आणि कल्पित याची जोड देऊन लिहिलेली एक दीर्घ कथा म्हणजे कादंबरी होय.''

## १.२ कादंबरीचे घटक :

कादंबरीच्या घटकांचे स्वरुप समजून घेणे म्हणजे कादंबरी या वाङ्मयाचा अभ्यास तसेच मूल्यमापन व रसग्रहण करणेस सोयीचे जाणे होय.

कादंबरीच्या रचनेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे घटक पडतात.

१) कथानक, २) व्यक्तिचित्रण, ३) वातावरण, ४) भाषाशैली आणि ५) निवेदनपद्धती हे कादंबरीचे मूळ घटक आहेत.

## १.२ १) कथानक :

कादंबरी हा कथात्मक गद्य वाङ्मयप्रकार असल्याने त्यामध्ये घटनांना महत्त्व आहे. ही घटनांची जी मालिका तयार होते या मालिकेलाच कादंबरीचे कथानक

म्हणतात. ऑरिस्टॉटल कथानकाला कथेचा आत्मा मानतो. त्यांच्या मते कथानकाला आदि, मद्य व अंत असेल तर त्याला समग्रता प्राप्त होते.

मानवाला एखाद्या रहस्याची जाणीव करून घेण्यात नेहमीच आतुरता असते. अगदी त्याप्रकारची रहस्याची निर्मिती करून कथानकात रंजकता आणली जाते. कादंबरी वाचताना वाचकाची जिज्ञासावृत्ती वाढवली जाते. मग पुढे काय ? असा प्रश्न पडतो. रंजनाच्या हेतूने कादंबरीत घटनांची साखळी निर्माण केली जाते आणि एका घटनेतून दुसरी आणि दुसरीतून तिसरी घटना निर्माण केली जाते. या घटनांमुळेच कथानक तयार होते. पाध्ये यांची 'वैतागवाडी', 'वासूनाका', सुभाष भेंडे यांची 'अंधारवाटा' या आधुनिक लेखकांनी कथानकाला फारसे महत्त्व दिले नाही.

## १.२ २) व्यक्तिचित्रण :

कादंबरीमध्ये व्यक्तिरेखा अथवा पात्र या घटकाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. सुधा जोशी म्हणतात, ''कथाकादंबरीत शब्दातून मूर्त केलेली एखाद्या व्यक्तीची प्रतिमा म्हणजे पात्र. व्यक्तीचे बहिरंग आणि तिचे अंतरंग म्हणजे तिचे बोलणे-वागणे, स्वभावविशेष,तिच्या वृत्तीप्रवृत्ती, तिचे भावविश्व, तिची जीवनदृष्टी, जीवन सरणी इत्यादींच्या चित्रणातून पात्राची विशिष्ट प्रतिमा साकार होते.''[४] कादंबरीमध्ये लेखक ज्या व्यक्तिरेखा उभ्या करतो, त्यांच्या स्वभावाचे विशेष वाचकांना वेगवेगळ्या प्रकारे कळत असतात. प्रत्येक पात्राची जीवनाविषयीची एक भूमिका असते. त्यानुसार त्याचे वर्तन, बोलणे, चालणे, चिंतन करणे, जीवनाविषयी मते व्यक्त करणे त्यातूनही त्या पात्राची, स्वभावाची वैशिष्ट्ये कळत असतात. या सर्वांतून लेखकाचीही एक भूमिका प्रकट होते.

कादंबरीतील पात्रांचे स्थिर प्रवृत्तीची आणि विकसनशील प्रवृत्तीची पात्रे असे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. रंजनवादी कादंबरीत स्थिर प्रवृत्तीची पात्रे आढळतात. ना.सी. फडकेंच्या कादंबरीत अशी पात्रे आढळतात. विकसनशील पात्रांवर काळसापेक्ष आणि परिस्थितीसापेक्ष अनेक क्रिया-प्रतिक्रियांचा परिणाम होत असतो. कादंबरीतील पात्रांचे स्थान आणि त्यांचे कार्य यावरून प्रमुख पात्रे आणि दुय्यम पात्रे असे वर्गीकरण केले जाते. प्रधान किंवा केंद्रवर्ती असणाऱ्या पात्रांना नायक किंवा नायिका आणि दुय्यम असणाऱ्या पात्रांना आदर्श ध्येयवादी आणि दुष्ट खलनायकही.

जीवनदर्शन घडवणाऱ्या कादंबरीतील पात्रे वास्तव वाटतात. या पात्रांचे वर्तन वास्तवातील व्यक्तींच्या वर्तनाशी सुसंगत वाटते. व्यक्तिचित्रणाविषयी म.सु. पाटील म्हणतात, ''पात्रात म्हणजे भांड्यात ज्याप्रमाणे आपण एखादा पदार्थ ठेवतो त्याप्रमाणे या पात्रात कलावंत आपली चित्तवृत्तीरुप जाणीव विशिष्ट करतो ही कलावंताच्या जाणिवेची वाहक बनतात. त्यांचे सादृश्य लौकिकातील माणसांशी असते. परंतु ते आभासात्मक असते. सुसान लँगर अशा निर्मितीला 'apparition' हा अर्थपूर्ण शब्द वापरते. त्यांचे अस्तित्त्व इंद्रधनुष्यासारखे किंवा मृगजळासारखे भासते. या गोष्टी जशा मूर्त असतात, सत्य असतात तरी स्पर्शातीत असतात त्याचप्रमाणे कलासृष्टीतील पात्रे ही मूर्त असली, सत्य असली तरी त्यांचे स्वरुप काहीसे वाजवी असते. त्यांना आपण भावू शकलो तरी लौकिकातील व्यक्तीप्रमाणे स्पर्शू शकत नाही. त्यांच्याशी बोलणे वा त्यांच्या कृतीउक्तींचे स्पष्टीकरण त्यांच्याकडे मागणे शक्य नसते. कारण त्यांच्या कृतीउक्तीही आभासात्मक असतात. अशा पात्रांनी साहित्याचा प्रांत गजबजलेला असतो. त्यांच्याद्वारेच

साहित्यिक मानवी जीवनाचे दर्शन घडवित असतो. मानवी स्वभावाचे विविध पैलू प्रत्ययाला आणून देत असतो.''[५] यावरून साहित्यकृतीतील व्यक्तींना पात्रे का म्हटले जाते हे दिसून येते. तसेच ही पात्रे मानवी जीवनाचे, स्वभावाचे दर्शन घडवितात हेही स्पष्ट होते.

## १.२ ३) वातावरण :

कादंबरीत वातावरणाला महत्त्वाचे स्थान आहे. मानवी जीवनावर निसर्गाचा तसेच भौगोलिक पर्यावरणाचा देखील परिणाम होत असतो. व्यक्ती ज्या वातावरणात जन्मते, वाढते आणि मृत्यू पावते त्या वातावरणाचा प्रत्यक्षरित्या परिणाम होताना दिसतो. वास्तविक पाहता लेखकाच्या लेखनातून याचा प्रत्यय येतो.

कादंबरीतील कथानक एका विशिष्ट स्थळकाळाच्या चौकटीत एका विशिष्ट भौगोलिक सामाजिक आणि सांस्कृतिक परिसरात घडत असते. हा परिसर म्हणजेच कादंबरीतील वातावरण होय. कादंबरीतील प्रसंग आणि व्यक्तिदर्शन प्रभावशाली होण्यासाठी लेखकाला विशिष्ट प्रकारची वातावरणनिर्मिती करावी लागते. त्यामुळे वातावरण हा कादंबरी लेखनातील एक महत्त्वाचा घटक आहे. याबाबत ना.सी. फडके म्हणतात, ''कथानकातील प्रत्येक महत्त्वाच्या घटनेला तेवढ्यापुरती तात्कालिक स्वतंत्र पार्श्वभूमी असणे जरुरीचे आहे. या पार्श्वभूमीच्या प्रकारास 'भोवतालचे वातावरण' म्हणून कादंबरीतील एखादी प्रमुख व्यक्ती जेव्हा काहीतरी महत्त्वाचे कृत्य करते किंवा एखादा महत्त्वाचा अनुभव येतो तेव्हा त्या खास प्रसंगासाठी म्हणून काही एक वातावरण निर्माण करण्याचे कसब फार मोलाचे आहे.

कारण असे वातावरण निर्मात्याबरोबर तो प्रसंग शतपट परिणामकारक होतो. कादंबरीतील प्रवेशाचा जिवंतपणा वाढविण्यास वातावरण उपयोगी पडते.''[६]

प्रादेशिक कादंबरीत भौगोलिक वातावरणाला महत्त्व आहे. तर सामाजिक कादंबरीत सामाजिक वातावरणाला महत्त्वाचे स्थान आहे. दलित समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यात सामाजिक वातावरणाला महत्त्वाचे स्थान असते. या सामाजिक वातावरणातून दलित समाजजीवनाचे दर्शन घडते.

**१.२ ४) भाषाशैली :**

कादंबरी लेखनामध्ये लेखक मानवी जीवनाचे आणि मानवी स्वभावाचे चित्रण करून कथाबंध निर्माण करत असतो. कथानकातून प्रसंगाचे किंवा मानवी स्वभावाचे चित्रण करावयाचे असते. परंतु हे चित्रण चित्ताकर्षक होण्यासाठी, प्रभावी होण्यासाठी त्याला विशिष्ट प्रकारच्या भाषाशैलीचा वापर करावा लागतो. समर्थ आशय व्यक्त करण्यासाठी समर्थ भाषाशैलीही असावी लागते. भाषेच्या माध्यमातून कादंबरीकार कथेतील जीवन-विश्व आणि भाव-विश्व उभा करीत असतो. त्यामुळे भाषाशैली हाही एक कादंबरीचा घटक आहे.

कादंबरीची भाषाशैली कशी असावी हे ज्या त्या लेखकाच्या उद्दिष्टानुसार व प्रवृत्तीनुसार अवलंबून असते हे खरे असले तरी त्या बाबतीत काही कादंबऱ्यांना समान अशी तत्त्वे आहेत. त्यातील एक महत्त्वाचे तत्व सांगताना ना.सी. फडके म्हणतात, ''ज्याप्रमाणे प्रसंगाशी त्याप्रमाणेच जे पात्र बोलत असेल त्याच्या व्यक्तिवैशिष्ट्याशी भाषेने संवादित्व राखले पाहिजे.''[७]

## १.२ ५) निवेदनशैली :

कादंबरीतील कथानक कोणाकडूनतरी वाचकांना सांगितले जाते. या सांगण्याच्या प्रक्रियेला निवेदन म्हणतात. निवेदनातून कादंबरीचे रुप आकार घेत असते. कादंबरीचा समग्र पट या निवेदनातून वाचकांसमोर उलघडला जातो. कादंबरीकार कथानकाची मांडणी करताना प्रथम पुरुषी निवेदन, द्वितीय पुरुषी निवेदन आणि तृतीय पुरूषी निवेदन या प्रकारच्या निवेदन शैलीचा वापर करत असतो. बहुतेक कादंबऱ्यांचे लेखन तृतीय पुरुषी निवेदनातूनच झालेले दिसून येते.

अशा प्रकारे कादंबरीला आवश्यक असणारे घटक आपण पाहिले. या घटकांच्या अनुषंगाने 'समिधा' या कादंबरीची वाङ्मयीन चिकित्सा करावयाची आहे.

## २) 'समिधा' कादंबरीचे कथानक :

'समिधा' या कादंबरीतून रणजित देसाई यांनी 'दलित-सवर्ण सघर्षाचे चित्रण केले आहे. कादंबरीच्या कथानकाची मांडणी करताना लेखकाने विचारपूर्वक घटनांची मांडणी केल्याचे जाणवते. देवा महार हा रानगावातील एका गरीब, नम्र, जुन्या वळणाचा इतरांसारखाच एक दलित माणूस. तुका हा देवाचा कर्तृत्वसंपन्न मुलगा आहे. गावचा सरपंच भगवंतराव देशमुख व त्याची चांडाळ चौकडी मिळून तुकाला व त्याच्या कुटुंबाला त्रास देतात. तुका जसजसा मोठा होत जातो तसतसा त्याला सवर्णांकडून होणारा अन्याय सहन होत नाही. शेवटी बापाच्या आग्रहाखातर दु:खी, कष्टी होऊन मुंबईला आपल्या चुलत्याकडे जातो. मुक्ता ही देवाची एकुलती एक हुशार, सुंदर, सालस कर्तबगार व महत्त्वाकांक्षी मुलगी आहे. ती आपले शिक्षण पूर्ण करून नर्सची नोकरी पत्करते आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी धडपड

करते. आपण शिकावे, स्वच्छ रहावे, नोकरी करावी, माणसासारखे जगावे हे तिचे स्वप्न शेवटी धुळीस मिळते.

तुका काही दिवस मुंबईस काकांकडे राहून जेव्हा रानगावला परत येतो तेव्हा तो आक्रमक होऊनच येतो. नवी जाणीव घेऊन तो परत गावी येतो. यशवंत खोराटेने लाटलेली जमीन परत मिळविण्याकरीता धडपडतो. त्याच्याशी भांडतो. आपल्या दलित बांधवांना गावच्या विहिरीतील पाणी मिळावे म्हणून गावचा सरपंच भगवंतराव देशमुख याच्याशी वैर पत्करतो. गावातील दलित समाजाला व दलित तरुणांना जागृत करून आपल्या हक्काची जाणीव करून देतो. आपल्यावर होणारा अन्याय-अत्याचार थांबावा आणि आपल्या समाजाला मिळणाऱ्या सवलतीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी तुका प्रयत्न करतो. यावरून तुकाचा कर्तबगारीपणा दिसून येतो. त्याला आपल्या समाजाविषयी असणारी ओढ व त्याचा धाडसीपणा यातून दिसून येतो. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर गुंडगिरी करून दलितांचे जीवन उद्‌ध्वस्त करू पाहणाऱ्या सवर्णाविरूद्ध बंड पुकारतो. परंतु देवाला हे तुकाचे वागणे पटत नाही. त्याचा याला विरोध आहे.

दलितांबद्दल आयुष्यभर झटणाऱ्या डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी व्हावी म्हणून तुका सर्व दलितांना संघटित करतो. परंतु मिरवणूकीच्यावेळी एका दलित मुलाच्या हातून गांधीजींच्या फोटोला हार घालताना चुकून पुतळ्याचा हात तुटून खाली पडतो. तेव्हा मात्र या हाताचे निमित्त करून दलित वस्ती जाळली जाते. त्यामध्ये तुकाचा बाप देवा व शेवंताचा बाप ही दोन माणसं मृत्युमुखी पडतात. लहान मुली, स्त्रियांच्यावर अन्याय अत्याचार केले जातात. यावरून सवर्णाचे दलितांवर होणारे अन्याय-अत्याचार किती क्रूर होते याचे दर्शन 'समिधा' मधून

होते. या हल्ल्याच्यावेळी तुका विरूद्ध मंत्री, पोलिस असून काही दलित मंडळीदेखील तुकाविरूद्ध भूमिका घेतात. दलितांच्या या वर्तनावरून आपलेच लोक आपले वैरी होताना दिसतात. तुकाला पाठिंबा देऊन त्याला खंबीरपणे लढण्यास प्रवृत्त न करता त्याची ताकद हाणून पाडताना हे दलित दिसतात.

तुकाची बहिण मुक्ता ही हुशार, जिद्दी व महत्त्वाकांक्षी असल्याने दहावी पास होते आणि नर्सची नोकरी पत्करते व स्वत:च्या पायावर उभारण्याची धडपड करते. मुक्ताच्या माध्यमातून एका दलित स्त्रीचे चित्रण लेखकाने केले आहे. तसेच मुक्ता दिसायला सुंदर व देखणी असल्याने रानगावचा सरपंच व त्याची चांडाळचौकडी पहिल्यापासूनच तिच्यावर नजर ठेवून असतात. परंतु त्यांच्या या वागण्याला भीक न घालता अगदी धाडसाने व ताठ मानेने जगण्याचा ती प्रयत्न करते. यातून एका धाडसी दलित स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. सरपंचाच्या हाती मुक्ता जेव्हा सहजासहजी लागत नाही तेव्हा मात्र सरपंच मुक्ताच्या दीड वर्षात चार ठिकाणी बदल्या घडवून आणतो. शेवटी तिच्यावर अत्याचार करण्यात हे यशस्वी होतात. कोर्टात मुक्ता जेव्हा ही केस दाखल करते तेव्हा तुका त्यांना शिक्षा व्हावी म्हणून पैसा खर्च करतो. परंतु त्यांचे हात मंत्र्यापर्यंत पोहचल्यामुळे त्यांची यातून निर्दोष मुक्तता होते. यावरून लेखकाला असे सूचित करावयाचे आहे की, देशाला स्वातंत्र्य मिळूनही हे सवर्ण मुक्तासारख्या कित्येक दलित अबलेवर अत्याचार करण्यात कार्यरत आहेत.

अशा प्रकारचे कथानक रणजित देसाई यांनी 'समिधा' मधून मांडले आहे. कादंबरीच्या कथनकाची मांडणी करताना लेखकाने ज्या घटना सांगितल्या आहेत त्या घटना सत्याच्या जवळून जाणाऱ्या किंवा सत्याशी एकजीव होणाऱ्या आहेत.

असे कोणालाही वाटणे साहजिक आहे. लेखकाने कादंबरीतून दलित आणि सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण केले अहे.

## ३.१ 'समिधा' मधील व्यक्तिरेखा :

रणजित देसाई यांनी 'समिधा' कांदबरीतून 'दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण कले आहे. त्यामध्ये सवर्णांच्या अन्याय-अत्याचाराला बळी पडणारी स्वातंत्र्यपूर्व दलित पिढी व स्वातंत्र्योत्तर दलित पिढीचे चित्रण केले आहे. 'समिधा' ही रणजित देसाई यांनी दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी कादंबरी लिहिली आहे. रानगावं या खेड्यातील दलित व सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण लेखकाने 'समिधा' मधून केले आहे. रानगावातील देवा महार, तुका व मुक्ता ही देवाची दोन मुले तसेच तेथील समस्त दलितांच्या जीवनावर आधारित या कादंबरीचे कथानक आहे. या कादंबरीच्या केंद्रभागी देवा महार यांचे कुटुंब असून बाकी सर्व दुय्यम आहेत. लेखकाने कांदबरीची रचना करताना मुख्य व्यक्तिरेखा तीन व बाकीच्या गौण व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा तुका, देवा व मुक्ता ह्या तीन व्यक्तिरेखा आहेत. तसेच गौण व्यक्तिरेखांमध्ये फादर जॉन, सुशिला मावशी, भोळे गुरुजी, ह्या सत्प्रवृत्तीच्या तसेच भगवंतराव देशमुख, यशवंत खोराटे, बंडू पुजारी, सत्तू रामोशी, यांचा समावेश होतो. ह्या दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा आहेत. यापैकी प्रथम मुख्य व्यक्तिचित्र सणाविषयी थोडक्यात -

### देवा -

कादंबरीचे संपूर्ण कथानक देवा महार या दलित व्यक्तीच्या कुटुंबाभोवती फिरते. कादंबरीत सवर्णांच्या अन्याय-अत्याचाराला बळी पडणारी स्वातंत्र्यपूर्व

दलित पिढी व त्यांना भीक न घालता मानाने जगू पाहणारी स्वातंत्र्योत्तर दलित तरुण पिढी अशा दोन पिढ्यांचे चित्रण लेखकाने केले आहे.

देवा महार हा पारंपरिक विचाराचा, जुन्या वळणाचा, सवर्णांकडून होणारा अन्याय-अत्याचार सहन करण्याची सवय पडून गेलेला दलितांचा प्रतिनिधी, देवाची पत्नी वारल्यानंतर तुका आणि मुक्ता या दोघांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्याच्यावर पडते. सवर्णांची पडेल ती कामे करून तो आपला उदरनिर्वाह चालवताना दिसतो. गावचा सरपंच भगवंतराव देशमुख खोराटेला देवाने पैशाच्या बदल्यात दिलेली जमीन पाहून त्याची जमीन हडप करण्याचा प्रयत्न करतो. त्यामध्ये यश न आल्यामुळे तुकाने गायीला धोंडा मारल्याचे निमित्त करून देवाच्या शेतात गुरे सोडतो. परंतु देवामध्ये त्याला जाब विचारण्याची हिंम्मत व ताकद नसल्याने देवा त्याच्याकडे जाऊन प्रामाणिकपणे चौकशी करतो आणि असे का केले हे विचारतो. तेव्हा भगवंतराव देवाला तीन पोती ज्वारी देऊन गप्प बसवतो. तुका शेताकडून घरी आल्यावर देवा त्याला देशमुखाच्या गायीला दगड मारण्याचे कारण विचारतो. तेव्हा तुका सांगतो की, देशमुखाची गाय जित्रापात शिरली होती. त्यावेळी सत्तू रामोशी आणि रामा रखवाला ही दोघे तिथे होती. त्यांना गाय हांबडायला सांगताना सत्तु रामोशी तुकाला म्हणाला की, ''असंल तुज्या बाची हिम्मत तर हाकल गाईला'' तवर गाइनं चार धाट मोडली व्हती. म्या गाईला हांबडल.

''दगुड मारला न्हाईस ?''

''देवाच्यान न्हाई. निक्ता खडा मारला.''

''अरं पोरा, म्हाराचा खडा धोंडा बनतुया. ठावं न्हाई तुला ? लेकरा परत असं करू नगस. सांजच लौकर ये.''[८] देवाच्या या उद्‌गारातून त्याचा घाबरट

स्वभाव दिसून येतो. सवर्णांच्या विरोधात न जाता त्यांच्या म्हणण्यानुसार वागणे देवा मान्य करताना दिसून येतो.

तुकाला जेव्हा आंबे पाडण्याच्या क्षुल्लक कारणावरून चावडीसमोर बांधून बेदम मारहाण करतात. तेव्हा देवा त्याबद्दल दु:ख व्यक्त करण्यापलीकडे काही करू शकत नाही. त्यांना विरोध करण्याइतकी हिम्मत त्याच्याकडे नाही. यावरून त्याचा दुबळेपणा दिसून येतो. तुका जेव्हा खोराटेने लाटलेली जमीन परत मिळवतो तेव्हा देवाला खूप आनंद होतो. देवाचा ऊर भरून येतो. डोळ्यातून येणारे पाणी पुसत लोकांसमोर अभिमानाने तो म्हणतो, ''आरं म्हाराच्या डोळ्यात कदी सुखाचं पाणी येत न्हाई ते तु दावलंस. एक आई गमावलीस पण दुसरी दावलीस.''[१] यावरून धरतीमातेविषयी असणाऱ्या श्रद्धेची कल्पना येते. आपण गरीब आणि दुबळे असल्याची जाणीव देवाला सतत आहे. म्हणूनच आपल्या मुलाने सवर्णांशी संघर्षाची भूमिका घेवू नये असे त्याला नेहमी वाटते.

आंबेडकर जयंतीच्या वेळी आंबेडकरांच्या पुतळ्याला डांबर फासल्याचे जेव्हा देवाला समजते तेव्हा, त्याविरूद्ध बंड करून उठण्याऐवजी तो आपल्या दलित बांधवांना गप्प बसण्याचा सल्ला देतो. यावरून सवर्णांकडून होणारा अन्याय-अत्याचार, गैरप्रकार, अपमान सहन करण्याबरोबरच त्याला विरोध न करण्याची व इतरांनाही न करू देण्याची त्याची वृत्ती लक्षात येते. देवा फादर जॉनच्या आग्रहाखातर आणि त्याच्या मदतीमुळे मुक्ताचे दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करतो. देवा हा जुन्या वळणाचा असल्याने तो पांरपरिक रुढी-परंपरा पाळताना दिसतो. त्याला मुक्ताचे शिक्षण आता बंद करावे असे वाटते. मुक्ता जेव्हा मध्येच शाळा बंद करून घरी राहते तेव्हा फादर जॉन तिची चौकशी करण्यासाठी देवाच्या घरी येतो.

तेव्हा त्याला देवा म्हणतो की, ''बाबा, मुक्ता आता थोर झाली, तिचं लगीन करायला पायजे.''[१०] देवा आठ वर्षाच्या मुक्तचे लग्न करायचे ठरवतो. यावरून त्याचा अशिक्षितपणा दिसून येतो. मुक्ता जेव्हा दहावी पास हाते, तेव्हा देवा तिचे लग्न करण्याचे ठरवतो. तेव्हा फादर जॉन देवाला म्हणतो की, ''देवा ! मुलगी ब्रिलियंट म्हणजे हुशार आहे. तिला शिकवं ! देवा हात जोडून म्हणाला, ''झालं तेवढं रेट झालं, बाबा, आता ही थोराड झाली, नवरा मिळायला मारामार आणि आनी शिकवू म्हंतासा ?''[११] देवाच्या या बोलण्यातून असे दिसून येते की, दलित समाजात मुलींचे लहान वयातच लग्न होणे गरजेचे वाटत होते. तसेच मुलींना जास्त शिक्षण देणे समाजाला मान्य नव्हते. मुलगी जास्त शिकली की तिला योग्य वर मिळणे कठीण असते असा समज त्या समाजात होता. यावरून दलित स्त्रियांना, त्यांच्या कुटुंबाकडून आणि समाजाकडून दिल्या जाणाऱ्या वागणूकीचे चित्रण लेखकाने 'समिधा' मधून केले आहे.

आंबेडकर जयंतीच्यावेळी सवर्णांनी केलेल्या दगडफेकीत व मारहाणीत देवा महार गंभीर जखमी होतो. मुक्ता जेव्हा देवाला भेटायला दवाखान्यात येते तेव्हा, देवा तुकाच्या वर्तनाविषयी नापसंती दाखवून म्हणतो, ''आपलं वारकऱ्याचं घराणं, आजवर कुणाला पोलिसांनी पकडलं होतं ? पोलिसांनी त्याला पकडलं बेड्या ठोकल्या.''[१२] तुकाने आंबेडकरांबद्दल प्रेम व आदर्श बाळगून दलितांच्या इच्छा जागृत करण्याचा आणि सवर्णाकडून परंपरागत होणाऱ्या जुलूमशाहीला विरोध करण्याचा प्रयत्न केला याबद्दल आपल्या मुलाविषयी समाधान व्यक्त करून, अभिमान बाळगण्याऐवजी देवा तुकालाच दोष देतो. यावरून देवाच्या मनोवृत्तीची कल्पना येते. देवाच्या व्यक्तिरेखेबाबत मत व्यक्त करताना डॉ. जी.पी. माळी

म्हणतात, ''गरीब, लाचार, सहनशील, भित्रा, देवभोळा, कुटुंबवत्सल, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि हळुवार स्वभावाचा देवा महार रणजित देसाईंनी उभा केला आहे.''[१३]

अशा प्रकारची देवाची व्यक्तिरेखा 'समिधा' मधून रणजित देसाईंनी प्रकट केली आहे.

**तुका –**

तुकाराम देवबा कांबळे ही या कादंबरीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. तुका हा या कादंबरीचा मुख्य नायक आहे. देवाचा तो एकुलता एक मुलगा आहे. तुकाचे आपल्या बापावर आणि बहिणीवर जिवापाड प्रेम आहे. तुकाचा स्वभाव बापापेक्षा पूर्ण विरूद्ध स्वभावाचा आहे. त्याला न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड आहे. अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी इतरांना प्रवृत्त करण्याचा स्वभाव आहे. युक्ती आणि कृती यांचा वापर करून संघर्ष करण्याचा लढाऊ बाणा त्याच्या अंगात भिणलेला आहे. सरपंच देशमुख, साहेबलाल मुल्ला, यशवंत खोराटे, रुद्र तेली, बंडू पुजारी, सत्तु रामोशी, विश्वासराव खंबाटे, महिपतराव नागनाळे, हे एकमेकांच्या सहकार्याने गावातील दलितांवर अन्याय अत्याचार करत राहतात. आणि ते अत्याचारही दलित मंडळी मुकाट्याने सहन करतात. परंतु ही परंपरा मोडून आंबेडकरी विचाराने पेटून उठून त्यांना विरोध करण्याची स्वाभिमानी भूमिका तुका स्वीकारताना दिसतो. तुका हा स्वातंत्र्योत्तर दलित पिढीतला नवा तरूण असल्याने तो स्वभावाने हुशार, धाडसी, कर्तबगार आणि महत्त्वाकांक्षी असल्याचा दिसून येते.

तुका काहीदिवस चुलत्याकडे मुंबईला राहून गावी परत येतो तेव्हा तो आक्रमक होऊन व नवी जाणीव घेऊन येतो. तो परत येताच गावामध्ये दलित–

सवर्ण संघर्षाला सुरुवात होते. सवर्णांचे दलितांवर होणारे अत्याचार थांबावेत यासाठी तो धडपडतो. आपल्या समाजात जागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतो. गावात पाणी नसल्याने होळीनंतर धुळवड करायची नाही असे तो सर्वांना ठणकावून सांगतो. यावरून तुकाला परिस्थितीचे भान असल्याचे दिसून येते. तसेच त्याचा समजुतदारपणाही यावरून दिसून येतो. गांधी जयंतीच्यावेळी दलित वस्तीतील मंडळी 'हरिजनवाडा' असा बोर्ड लावतात तेव्हा गावचा सरपंच भगवंतराव देशमुख हा हरिजनांना धमकी देतो. तेव्हा तुका त्याच्या धमकीला न घाबरता त्याला प्रत्युत्तर देताना म्हणतो की, ''मालक, मेलेलं कोकरू आगीला भीत नाही.''[१४] अशा स्पष्ट शब्दात तुका सरपंचाला बजावतो. यावरून त्याचा स्पष्टवक्तेपणा व बेडरपणा दिसून येतो. बसवंत जैनाची म्हैस जेव्हा मरते तेव्हा तुका मेलेलं ढोर ओढण्यास नकार देतो. तेव्हा सवर्ण दलितांना म्हणतात की, मेलेलं ढोरं ओढला नाही तर बलुत मिळणार नाही. तेव्हा तुका आपल्या दलित बांधवांना सांगतो की, ''जगायचंच तर माणूस म्हणून जगू, न्हाईतर उपाशी मरू. बाबा हे सांगून सांगून खपला पण तुमाला तेची लाज न्हाई.''[१५] अशा शब्दात तुका त्यांची कानउघाडणी करतो. तुकाच्या या बोलण्यातून एका आंबेडकरी विचाराने भारावलेल्या स्वातंत्र्योत्तर दलित तरुणाचे दर्शन घडते.

डॉ. आंबेडकरांवरील असणाऱ्या निष्ठेची जाणीव त्याच्या बोलण्यातून येते. आंबेडकर जयंतीच्यावेळी काहीही चूक नसताना एका दलित मुलाच्या हातून गांधीजींच्या पुतळ्याला हार घालताना अजानतेपणे पुतळ्याचा हात तुटून खाली पडतो. या कारणावरून दलित वस्ती जाळली जाते. तेव्हा तुका मंत्र्यांना न घाबरता या गोष्टीचा जाब विचारतो. आणि नुकसान भरपाईची मागणी करतो. परंतु मंत्र्यांवर

त्याचा काहीच परिणाम होत नाही. या घटनेतून डॉ. माळी तुकाच्या व्यक्तिरेखेविषयी म्हणतात की, ''यावेळी मात्र त्याचे चित्रण कृत्रिम, अवास्तव व बटबटीत वाटते. काहीसे अतिशयोक्तीपूर्ण ठरते. कथानकाच्या उभारणीला गती देण्याच्या भरात तुकाचे चित्र वास्तवापासून दूर गेले आहे, याची जाणीव होते.''[१६]

तुका हा आंबेडकरी विचाराने भारावून गेलेला असल्याने समाजात क्रांती घडवून आणतो. समाजासाठी तक्क्या बांधतो. घरे बांधून देतो. तसेच रस्ते करून देतो. परंतु तुका हा आंबेडकरी विचाराचा असूनदेखील देवाधर्मासारख्या गोष्टीवर विश्वास ठेवताना दिसतो. समाजात जेव्हा तक्क्या बांधतो, तेव्हा तक्क्यात प्रथम विठ्ठली-रखुमाईची मुर्ती आणून बसवितो. देवा जेव्हा मुक्ताचे शिक्षण बंद करण्याचा निर्णय घेतो तेव्हा तुका मुक्ताला नर्सचा कोर्स करायची जिम्मेदारी घेतो. यावरून त्याचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन दिसून येतो. स्वतःच्या सुखाचा विचार न करता त्यागी वृत्तीने समाजसेवेला वाहून घेणाऱ्या ध्येयवादी दलित तरुणाची ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. लेखकाने तुकाच्या व्यक्तिरेखेतून एका हुशार, निर्भय,व्यवहारचतुर, तत्त्वनिष्ठ दलित तरुण रेखाटण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे.

**मुक्ता –**

मुक्ता ही या कादंबरीची मुख्य नायिका आहे. देवबा आणि तुका यानंतरची 'समिधा'तील महत्त्वाची व्यक्तिरेखा मुक्ता ही आहे. स्त्रीव्यक्तिरेखेमध्ये मुक्ता ही मुख्य व्यक्तिरेखा आहे. 'समिधा' या कादंबरीमध्ये पुरुष पात्रांची गर्दी झालेली दिसून येते. तसेच स्त्रीव्यक्तिरेखामध्ये शेवंता व सुशिलामावशी यांचा समावेश होतो. परंतु मुक्ता या व्यक्तिरेखेला स्वतंत्र अस्तित्त्व आहे. डॉ. माळी मुक्ताच्या

व्यक्तिरेखेबाबत म्हणतात, 'मुक्ता या नावावरूनच सवर्णांच्या पिळवणूक, छळवणूकीपासून मुक्त होवून स्वावलंबी, स्वाभिमानी वृत्तीने जगू इच्छिणाऱ्या स्त्रीची ही व्यक्तिरेखा असल्याचे लक्षात येते.'[१७] यावरून मुक्ताचे कादंबरीतील स्थान लक्षात येते.

मुक्ता ही देवाची एकुलती एक मुलगी. तिला बापाविषयी आदर आणि भावाविषयी जिव्हाळा आहे. शिक्षणाची तिला प्रचंड आवड असलेली दिसून येते. आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही हार न मानता फादर जॉनच्या प्रेरणेने आणि मदतीने ती शिक्षण घेते. यावरून तिच्या कष्टाळू शोषिक, शिक्षणाविषयीची ओढ, जिद्द व महत्त्वाकांक्षी स्वभावाची ओळख होते. 'झिल्या' हे कुत्रे जेव्हा पिसाळल्याचे समजते, तेव्हा त्याला मारुन टाकण्याचा निर्णय सर्वजण घेतात. हा निर्णय ऐकताच मुक्ताच्या डोळ्यात पाणी उभे राहते. तुका जेव्हा विहिरीकडे जातो, तेव्हा मुक्ता त्याच्या पाठोपाठ पळत जाते आणि तुकाच्या हातात पुरचुंडी देवून रडत माघारी धावत सुटते. त्या पुरचुंडीत दोन खारी बिस्किटे असतात. झिल्याला ती बिस्किटे खूप आवडायची. यावरून मुक्ताच्या दयाळू स्वभावाची ओळख पटते. तुका जेव्हा मुंबईला जाण्यास निघतो तेव्हा तिचा उर अभिमानाने भरून येतो. तुकाला जेव्हा गावकरी बेदम मारहाण करतात तेव्हा ती दु:खाने तळमळते यावरून तिचा संवेदनशील व हळुवार स्वभाव स्पष्ट होतो.

फादर जॉनच्या मदतीमुळे मुक्ता आपले शिक्षण पूर्ण करते. म्हणून त्यांच्याविषयी तिला अभिमान आहे. ते वेगळ्या धर्माचे असूनदेखील आपल्याला माणुसकीने वागवतात आणि आपल्या धर्माचे लोक मात्र आपल्याला त्रास देतात याचे तिला वाईट वाटते. देशमुखाच्या वाड्यात पूजा असल्याने बंडू पुजारी मुक्ताला

न कळता तिच्या झाडाची फुलं तो घेऊन जातो. हे जेव्हा तिला कळते,तेव्हा ती रोखठोक प्रश्न उपस्थित करते की, ''माझी फुलं चालत्यात आनी मी चालत न्हाई ?''[१८] यावरून तिच्या चौकस बुद्धीचा प्रत्यय येतो.

मुक्ता दिसायला नाजूक बांध्याची, उंच आणि चारचौघीत उठून दिसणारी आहे. मुक्ता आपले शिक्षण पूर्ण करून नर्सची नोकरी पत्करते. मुक्ता देखणी असल्याने रानगावचा सरपंच, भगवंतराव देशमुख आणि त्याची चांडाळचौकडी तिच्यावर नजर ठेवून असतात. परंतु मुक्ता सहजासहजी त्यांच्या हाती लागत नाही. हे लक्षात येताच दीड वर्षात तिच्या चार ठिकाणी बदल्या घडवून आणतात. परंतु ती सरपंच देशमुख व वसवडचे सरपंच महिपतराव नागनाळे यांच्या धमक्यांना दाद देत नाही. डॉ. देवतळे मुक्ताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु ती खचून जात नाही. शेवटी मुक्ताला बलात्काराला सामोरे जावे लागते. तिची अब्रू लुटली जाते.

लेखकाने मुक्ताच्या माध्यमातून नोकरी करणाऱ्या दलित स्त्रीचे दर्शन घडविले आहे. अशा स्त्रियांच्या अब्रू लुटणाऱ्या नरराक्षसांच्या तावडीतून सहीसलामत सुटण्यासारखी परिस्थिती अजूनही निर्माण झाली नसल्याचे लेखकाने दाखवून दिले आहे.

## ३.२ गौण व्यक्तिरेखा :

गौण व्यक्तिरेखामध्ये लेखकाने काही सत्प्रवृत्तीच्या तर काही दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. त्यामध्ये सत्प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे –

**फादर जॉन :**

फादर जॉन हा ख्रिश्चन मिशन हायस्कूलमध्ये टिचर आहे.मुक्ताचे देखील ते गुरुच आहेत. फादर जॉनमुळे मुक्ता स्वावलंबी व स्वाभिमानी बनते. मुक्तासारख्या एका दलित मुलीला आर्थिक तसेच मानसिक मदत करून तिला स्वत:च्या पायावर उभीं राहण्यापर्यंत मदत करतो आणि मुक्ताच्या बापाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. यावरून फादर जॉनच्या स्वभावाची ओळख पटते. मुक्तावर जेव्हा बलात्कार होतो तेव्हा त्याना खूप वाईट वाटते पण ते तिला मानसिक आधार देवून परिस्थितीला सामोर जाणे हीच खरी जीवनाची कसोटी आहे हे सांगतात. तसेच ते म्हणतात की, ही मंडळी जे कृत्य करतात त्याना माहीत नाही की ते काय करत आहेत तेव्हा देवाला सांगतो की देवा त्यांना क्षमा कर. यावरून फादर जॉनच्या हळूवार संवेदनशील स्वभावाची ओळख पटते.

**भोळे गुरुजी –**

भोळे गुरुजी सत्याच्या बाजूने लढणारे पात्र आहे. रानगावातील सवर्ण जेव्हा दलितांवर अन्याय अत्याचार करतात तेव्हा भोळे गुरुजी दलितांच्या बाजूने लढण्यास तयार होतात. तालुक्याला जाऊन दलितांवरील अत्याचार थांबवण्याकरीता पोलिस गाड्या गावात आणतात. यावरून दलितांविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीचे दर्शन त्यांच्या स्वभावातून दिसून येते. एका दलित मुलाच्या हातून गांधीजीच्या पुतळ्याला हार घालताना पुतळ्याचा हात तुटून खाली पडतो तेव्हा सवर्ण खवळतात. भोळे गुरुजी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतात. परंतु हे प्रकरण विकोपाला जाते.

यावरून भोळे गुरुजींच्या प्रामाणिक व सत्त्वशील स्वभावाची ओळख पटते.

**रावजी कांबळे –**

रावजी कांबळे हा देवाचा भाऊ व तुकाचा काका. रावजी कांबळे हा मुंबईत राहातो. चांगली नोकरी त्याला असल्याने देवाकडे त्याचे येणे–जाणे आहे. वेळोवेळी तो त्याला पैशाची मदत करतो. तुकाला आपल्यासोबत मुंबईला घेऊन जातो. रावजी कांबळेमुळे तुका आक्रमक बनतो व आंबेडकरी विचार आत्मसात करून कृतीशील बनतो. तुकाला आधुनिक विचार आत्मसात करून आपल्या हक्काची जाणीव करून देण्याचे काम रावजी कांबळे करतो. यावरून रावजी कांबळेच्या संवेदनशील स्वभावाची ओळख पटते.

**सुशिला मावशी –**

मुक्ताची सुशिला ही मावशी म्हणजे देवाची मेव्हुणी आहे. ती मुंबईला फडात काम करते. दवाखान्यात मुक्ताची आणि तिची ओळख होते तेव्हा तिला जेव्हा समजते की ही आपल्या विठाक्काची मुलगी आहे तेव्हा तिचा ऊर अभिमानाने भरून येतो. आणि ती रडते. नवऱ्याने चैनीसाठी तिला दुसऱ्याला विकलेले समजते तेव्हा ती त्याला सोडून देते. तसेच मुक्तावर जेव्हा बलात्कार झाल्याचे समजते तेव्हा ती मुक्ताला आर्थिक मदत करते आणि कोर्टात खंबीरपणे लढण्यास सांगते.

यावरून सुशिला मावशीच्या कनवाळू स्वभावाची ओळख पटते. अशा प्रकारे रणजित देसाई यांनी फादर जॉन, भोळे गुरुजी, रावजी कांबळे आणि सुशिला मावशी या चार व्यक्तिरेखा सत्प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा म्हणून रेखाटल्या आहेत. तसेच काही दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटल्या आहेत. रानगावचा सरपंच व त्याची चांडाळचौकडी यांच्यामुळे गावातील वातावरण बिघडते. दलितांना ते त्रास देतात दलितांवर दगडफेक करतात. दलित स्त्रियांची अब्रू लुटतात. दलित

वस्ती जाळतात. त्यामध्ये देवाचा बळी जातो. परंतु या ज्या सत्प्रवृत्तीच्या व्यक्ती आहेत त्यांच्यामुळे गावातील तणावाचे वातावरण थोडेसे निवळते. गावतील दलितांचे जीवन थोडेसे सुखकर होते. लेखकाने रेखाटलेल्या दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखांबाबत थोडेसे -

**दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा :**

रानगावातील दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखांमध्ये मुख्य भगवंतराव देशमुख हा रानगावचा सरपंच होय आणि त्याची चांडाळचौकडी होय. यामध्ये यशवंत खोराटे, बंडू पुजारी, संत्तू रामोशी, महिपतराव नागनाळे, साहेबलाल मुल्ला, रुद्र तेली, विश्वासराव खंबाटे यांचा समावेश होतो. ह्या व्यक्तिरेखा दुष्ट प्रवृत्तीच्या आहेत. खून, मारामारी, भांडण, भानगडी, विश्वासघात, संधीसाधुपणा, दलितांचा छळ ही या सर्वांची सामुहिक प्रवृत्ती आहे. या चांडाळचौकडीमुळे रानगावातील वातावरण बिघडते. दलितांना ते त्रास देतात. दलितांवर दगडफेक करतात व दलित स्त्रियांना बेअब्रू करून सोडतात. दलित वस्ती जाळतात अशा प्रकारची नीच प्रवृत्ती यांच्यामध्ये दिसून येते.

अशा प्रकारे लेखकाने मुख्य व गौण व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. एकूणच येथे पुरुषांची गर्दी झाल्याचे दिसून येते.

**४) व्यक्तिरेखांविषयी अभ्यासकांची मते :**

रणजित देसाई यांनी लिहिलेल्या ‘समिधा’ या कांदबरीतील व्यक्तिचित्रणाविषयी काही अभ्यासकांनी अनुकूल प्रतिकूल अशी दोन्ही प्रकारची मते नोंदविली आहेत. यापैकी प्रा. दत्ता भोसले यांनी ‘‘यातील पात्रेही भडक, कृत्रिम साचेबंद आहेत असेही म्हणता यायचे नाही.’’[१९] असे चांगले मत व्यक्त

केले आहे. तर डॉ. मदन कुलकर्णी यांनी, 'समिधा' या कादंबरीतून ग्रामजीवनातील दलित चित्रणाकडे ते वळलेले आहेत. पण साहित्यात अपेक्षित असणाऱ्या वास्तवतेच्या प्रकृतीचा अभाव त्यांच्या वाङ्मयातआढळतो.''[२०] अशा प्रकारे 'समिधा' मधील उणीव त्यानी प्रकट केलेली आहे. तुकाच्या व्यक्तिरेखेचा अभाव वगळता प्रा. भोसले यांचा अभिप्राय मान्य होण्यासारखा असला तरी डॉ. कुलकर्णी यांनी निर्देशिलेली उणीव अवास्तव वाटते असे डॉ. माळी आपले मत व्यक्त करताना व याचे कारण सांगताना ते म्हणतात, ''१९६० च्या सुमारास प्रस्थापित होऊ लागलेल्या दलित साहित्याच्या प्रकृतीशी एकरुप होणारा आशयच प्रस्तुत कांदबरीत रेखाटला गेला आहे. फडके-खांडेकरी तंत्राचा थोडासा प्रभाव जाणवत असला तरी वास्तवापासून दूर जाऊन केवळ रंजन करण्याची भूमिका रणजित देसाईंनी स्वीकारल्याचे जाणवत नाही.''[२१] तसेच र.बा. मंचरकर हे आपले मत व्यक्त करताना म्हणतात की, '' 'समिधा'च्या रुपाने ग्रामजीवनातील दलित चित्रणाकडे ते पुन्हा वळलेले दिसतात. पण त्यांच्या रोमँटिक पिंडाला ग्रामीण साहित्याची वास्तववादी प्रकृती मानवणे कठीण वाटते.''[२२] परंतु ही प्रतिक्रिया अवास्तव वाटते. असे असले तरी रोमँटिक मनोवृत्ती आणि ग्रामीण वास्तववादी प्रकृती यांचा मिलाफ झाल्याचे 'बारी', 'माझा गाव', 'समिधा' यासारख्या कादंबऱ्या निर्माण झाल्या ही वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारे कांही अभ्यासकांनी 'समिधा'मधील व्यक्तिरेखांबद्दल आपली चांगली-वाईट मते व्यक्त केली आहेत.

डॉ. माळी म्हणतात, की, ''व्यक्तिचित्रणांच्या दृष्टीने विचार करताना सांकेतिकता, कृत्रिम योगायोग, साचेबंदपणा आणि अवास्तव घटना प्रसंगांचे चित्रण इ. दोष जाणवत असले तरी कोठेही त्यांचा अतिरेक झाल्याचे दिसत नाही.''[२३]

अशाप्रकारे लेखकाने पात्रांची निर्मिती करताना अगदी विचारपूर्वक केल्याचे दिसून येते.

## ५) 'समिधा' मधील वातावरण :

प्रत्येक घटना घडत असताना ती एका विशिष्ट अशा वातावरणात घडत असते. 'समिधा' या कादंबरीचे कथानक एका खेड्यातील दलितांच्या जीवनावर आधारित आहे. हे लक्षात घेऊन लेखकाने आशयानुरुप वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखकाने दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण करताना एकिकडे हरिजनवाडा आणि दुसरीकडे देशमुखांचा वाडा असा विरोधाभास निर्माण करून परिणामकारकता साधण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. शंकर पाटील यांच्या चित्रपट कथांमधून आढळणारा व निळू फुले यांच्या सहजसुंदर अभिनयातून साकार होणारा इरसाल पुढारी रानगावच्या माध्यमातून 'समिधा'मधून साकार झाला आहे.

रानगावचं वर्णन करताना रानगाव नजरेत भरावं असं लेखकाने केलं आहे. ''त्या टेकडीच्या पायथ्याला रानगांव वसलेलं होतं. चर्चच्या कमानीदार प्रवेशद्वारात उभं राहिलं की,पायथ्याचं गाव नजरेत यायचं, गावातलं महादेवाच देऊळ, गावचे चार चौक,रस्त्याकडेनं उभी राहिलेली तांबड्या-काळ्या खापरांची घर, सारं दिसायचं. गाव आणि चर्च यांच्यामधून टेकडीच्या गळसांडीने डांबरी राज-रस्ता वळण घेत पुढे सरकला होता. त्या रस्त्यावरून दिवस-रात्र, एस्.टी., ट्रक, खाजगी मोटारी यांची घरघर चालू असे. त्या डांबरी रस्त्याला रानगावात जाणारा कच्चा रस्ता फुटे. रानगावला येणारी माणसं त्याच फाट्यावर उतरत. फाट्यालगत उंच पिंपळाच झाडं सरसळत उभं होतं आलेले उतारु सावलीखाली विसावत थोडी विश्रांती घेवून

सामानासह गावची वाट धरीतं.''[२४] या वर्णनावरून रानगावचं दर्शन घडल्याखेरीज राहत नाही.

लेखकाने एकिकडे हरिजनवाडा आणि दुसरीकडे देशमुखांचा वाडा हे वातावरण लक्षणीय ठरावे असे केले आहे. ते लिहितात की, ''हरिजनवाड्यात शांतता पसरली होती. हरिजनवाडा म्हणजे अनेक पडक्या दगडांनी रचलेल्या बैठका, छोट्या घरांचा समुदाय, त्यात मधून-मधून पसरलेल्या गवती झोपड्या, अनेक उकिरडे, अनेक सांडपाण्याच्या जागा, त्यामधून जाणारे ते नागमोडी चिंचोळे रस्ते. सावरलेली पडकी घरटी. वाकड्या छपरावर डोलणारी तोरणं सारं कसं नागड्या पोराला चांदीचा कडदोरा बांधावा तसं दिसत होतं.''[२५] यावरून देशमुखाचा वाडा आणि हरिजनवाडा तसेच दलित-सवर्ण यांचे जीवनमान लक्षात येते.

रानगावातील लोकांच्या जीवनातील दैनंदिन घडामोडी, जयंती, पुण्यतिथीचे कार्यक्रम, दलितांवर सवर्णांचे होणारे अत्याचार या चित्रणातून लेखकाचे वर्णन कौशल्याचे आणि सूक्ष्म निरिक्षण शक्तीची प्रचिती येते. डॉ. माळी म्हणतात की, ''प्रसंगातील नाट्य हेरुन कथानकाला गती देण्याची आणि त्याद्वारे वातावरण निर्मिती करण्याची रणजित देसाई यांची शैली 'समिधा' मध्ये पहावयास मिळते.''[२६]

अशाप्रकारे आशयाला अनुसरुन वातावरणनिर्मिती केल्याचे 'समिधा'मधून दिसून येते.

## ६) 'समिधा'मधील भाषाशैली :

'समिधा' या कादबरीतील भाषा निवेदनाची ग्रामीण वातावरण चित्रित करणारी आहे. देसाई यांच्या 'बारी' व 'माझा गाव' या कादंबऱ्यांपेक्षा ही भाषा

वेगळी वाटत नाही. वाक्यप्रचार, म्हणी, चटकदार व नाट्यपूर्ण संवाद, व्यक्ती आणि प्रसंगानुरुन शब्दयोजना ही 'समिधा' या कादंबरीतील भाषेची वैशिष्ट्ये म्हणावी लागतात.

## ६.१ म्हणी –

रणजित देसाई यांनी 'समिधा' या कादंबरीमध्ये म्हणींचा वापर केल्याचे दिसून येते. या कादंबरीमध्ये दलित सवर्ण संघर्षाचे चित्रण आल्याने जातीवाचक तसेच व्यवहारदर्शक, संख्यादर्शक, शरीरवाचक म्हणींचा वापर केल्याचे दिसून येते. म्हणी पुढीलप्रमाणे –

१) ''राजानं मारलं, आणि पावसानं झोडपल, तर सांगायच कोणाला ?''
२) ''सशाला खळगा जामीन''
३) ''कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ''
४) ''स्टीच इन टाइम सेव्हज द नाईन''
५) ''रेडा सोडू नये पाण्यात आणि महार सोडू नये महारवाड्यात''
६) ''पाद खरं नांद''

अशाप्रकारच्या म्हणींचा वापर लेखकाने 'समिधा' मध्ये केलेला दिसून येतो. म्हणींच्या वापरामुळे भाषेचे सौंदर्य वाढल्याचे दिसून येते.

## ६.२ वाक्प्रचार –

लेखकाने या कादंबरीमध्ये वाक्प्रचारांचा उपयोग केल्याचा दिसून येतो. वाक्प्रचाराच्या वापरामुळे भाषेला एका वेगळ्या प्रकारचे सौंदर्य लाभले आहे. 'समिधा' मधून खालील प्रकारचे वाक्प्रचार आढळतात.

१. तालेवार होणे

२. मिजास उतरणे

३. कांबळे पसरणे

४. मंदिल बांधणे

५. तेढ असणे

६. डोळ्याला डोळा भिडवणे

७. पारा चढणे

८. खिळ घालणे

९. विप्रित करणे

१०. चुक पोटात घालणे

११. तोंडाला पाणी सुटणे

१२. कानोसा घेणे

१३. गाळी देणे इ.

## ६.३ अलंकारिक वाक्ये –

लेखकाने 'समिधा' कादंबरीमध्ये अलांकारिक वाक्ये पेरुन भाषेला चांगले वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. अलंकारिक वाक्यरचनेमुळे उठावदार भाषाशैलीचे दर्शन घडते. 'समिधा' मधून आलेली अलंकारिक वाक्ये खालीलप्रमाणे –

१. 'आता जमिनी तव्यावरच्या भाकरीगत फुलतील.'

२. 'एखादा विंचू डसावा तसा भगवंतराव मागे सरकला.'

३. 'वळवाच्या पावसात फेसाळत ओढा यावा तसा माणसाचा पूर हरिजनवाड्यात घुसला.'

४. 'सारा महारवाडा कापरासारखा जळू लागला.'

५. 'नागाच दर्शन घडताच जागच्या जागी उंदीर मारला जावा तशी मुक्ताची अवस्था झाली.'

अशा प्रकारची अलंकारिक वाक्ये लेखकाने 'समिधा'मध्ये पेरुन भाषेचे सौंदर्य वाढविले आहे.

## ६.४ 'समिधा' मधील संवाद –

लेखकाने 'समिधा' या कादंबरीत ग्रामीण भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे ग्रामीण भाषेतील संवाद या कादंबरीतून दिसून येतो. पात्रांच्या संवादातून अडाणी-गावंडळ भाषा वापरलेली दिसून येते. दलितांच्या तोंडून घाबरट व लाचारपणाचे संवाद दिसून येतात. तर सवर्णांच्या तोंडून हुकुमशाही, अरेरावीपणाचे संवाद ऐकायला मिळतात. यावरून अस्सल ग्रामीण व दलित जीवनानुभव येतो. संवादातून म्हणी, वाक्प्रचार, अलंकारिक वाक्ये तसेच घाणेरड्या शिव्यादेखील दिल्या आहेत. असे कांही संवाद खालीलप्रमाणे –

शेवंता जेव्हा पाण्याला जाते तेव्हा रुद्र तेली तिच्या वाटेत आडवा जातो आणि म्हणतो की,

''येळ केलास पाण्याला ?
'व्हय जी ।'
'कवा आलीस ?'
'मागच्या आदीतवारी जी ।'
'आता न्हाणार न्हव ?'
'व्हय जी जातू,' म्हणत शेवंता चालू लागली.

'ये थांब', रुद्र म्हणाला. त्यानं आजूबाजूला पाहिलं, माळावर कोणी दिसत नव्हंत. शेवंती थांबली होती. मागे वळून रुद्रकडे पहात होती. रुद्र जवळ गेला घोगऱ्या आवाजात म्हणाला,

'आज रात्री दुकान सारवायला ये. लई डिवळं निघाल्यात'

'रातीचं ?' शेवंता हसून म्हणाली.

'दुकान झाल्यावरच सारवण व्हनार ! खर का न्हाई ?'

आणि रुद्रने चक्क डोळा घातला. शेवंता लाजली.

'बाला सांगा.'

'सांगतो की !' रुद्र आनंदान म्हणाला. (पृ.क्र.४६, ४७)

या संवादावरून एका व्यभिचारी दलित स्त्रीचे दर्शन घडते. यशवंत खोराटेने भाताची मळणी घातली आहे हे समजातच देवा भात आणण्यासाठी राशीजवळ जातो तेव्हा खोराटे त्याला म्हणतो,

''कोन, देवा ! का आलास ?''

''मालकऽ !''

''आयला तुमच्या म्हारांच्या ! लाज न्हाई वाटत ? खळ्यावर आलास ! कुटं पळून जात व्हतो काय ?''

''तस न्हव मालक ! घरात काय बी न्हाई, तवा ....''

''घरात नेऊन लक्ष्मी पुजल्याबिगार एक दाना मिळणार न्हाई. तुजं आसल ते उद्या घरला येऊन घेऊन जा.''

या संवादावरून देवा हा परिस्थितीपुढे लाचार झाल्याचे दिसून येते. परंतु खोराटेला त्याचे काहीही वाटत नाही. देवाला भात देणे हा तो अपशकून समजतो.

आंबेडकर जयंतीच्यावेळी जेव्हा एका मुलाच्या हातून गांधीजींच्या पुतळ्याचा हात तुटतो तेव्हा साहेबलाल देशमुखांच्या कट्ट्यावर बसून येईल त्याला पुतळ्याचा तुटलेला हात दाखवताना बघेल तो चुकचुकत बडबडत होता.

''का हून हात तोडला असेल ?......''

''असं करणाऱ्याचं हात का झडलं न्हाईत ?.....''

''माज चढलाय हलकटास्नी...''

''तिळपट होवो मेल्यांचा.....''

''हात तोडा भडव्यांचं....'' (पृ.क्र.१०९)

अशाप्रकारे ग्रामीण भाषेत व गावंडळ शब्दात शिव्या 'समिधा' मधून दिलेल्या दिसून येतात. या संवादातून अस्सल ग्रामीण जीवनचित्रण समोर उभे राहते.

तुकाचा बाप जेव्हा मरतो तेव्हा पी.एस्.आय. म्हणतात की,

''आता पुढं काय करायचं ?''

''बा माझा ! तुमी काम करणार ? रीती परमानं आमच्या स्मशानात आमी पुरु त्याला.''

''पण प्रेतयात्रा काढता येणार नाही'' जरा कठोरपणे पी.एस्.आय्. नं सांगितलं.

''का ?''

''सुरक्षिततेच्या दृष्टीनं......''

''आयला झवली तुमची सुरक्षा'' तुका ओरडला. ''दगडाने ठेचून माझ्या बाला मारलं तवा तुमची सुरक्षा कुठं होती. आता तेला चोरासारखा पुरु म्हंता !'' (पृ.क्र. १३०)

या संवादातून तुकाचा स्पष्टवक्तेपणा व बेडरपणा दिसून येतो. तुकाचा बाप जेव्हा गमावतो व मुक्ताची इज्जत जेव्हा लुटली जाते तेव्हा या जगात देव नाही असे तुकाला वाटते. त्याचा देवावरचा विश्वास उठतो. तेव्हा कोंडिबाला म्हणतो की,

''अरे कोंड्या, आमास्नी लाज न्हाई ! आबरु न्हाई ! जात न्हाई.... धरम ... न्हाई.. गाव न्हाई....शेत न्हाई... मग देव कुठला ? आमाला या जगात कोनी न्हाई.... कोनी न्हाई....'' (पृ.क्र १७१)

यावरून एका स्वातंत्र्योत्तर दलित तरुण पिढीचे चित्र रेखाटल्याचे दिसून येते. तुकाच्या या उद्गारावरून लेखकाने कादंबरीला दिलेल्या 'समिधा' या शीर्षकाचा अर्थ समजतो. एका दलित तरुणाच्या इच्छा-अपेक्षा सवर्ण स्वत:च्या इच्छेसाठी कशाप्रकारे हाणून पाडतात याचे दर्शन 'समिधा' मधून घडते.

अशा प्रकारे 'समिधा' मधील संवाद पाहिले तर ते अस्स्ल ग्रामीण व दलित पातळीवरचे असल्याचे जाणवते.

## ६.५ 'समिधा'मधील शब्दयोजना

लेखकाने 'समिधा' या कादंबरीत ग्रामीण व दलित शब्दांचा वापर केल्याचे दिसून येते. हे शब्द गावंडळ व अशिक्षित लोकांच्या तोंडून आलेले आढळतात. तसेच हिन्दी, इंग्रजी शब्दांचा तसेच वाक्यांचाही वापर या कादंबरीत केला आहे. 'समिधा' मध्ये देवा तसेच दलित मंडळी, रानगावचा सरपंच भगवंतराव व त्याची चांडाळचौकडी यांच्या तोंडून गावंडळ, अशिक्षित अश्लील शब्द आढळतात. तर साहेबराव मुल्ला यांच्या तोंडून हिन्दी वाक्ये तर फादर जॉनच्या तोंडून इंग्रजी शब्द व

वाक्ये उच्चारताना दिसून येतात. तसेच प्रमाणभाषेचाही वापर कांदबरीत केला आहे.

जोहार, धनी, वर्सामाग, इट्टला शप्पत, वाईचसी, कार्ड, भडव्या, आयला, रांड, माकडास्नी, शिंच्यांनो, आयला झवली असे बरेच शब्द 'समिधा'तून आढळतात.

साहेबलाल मुल्ला हिन्दी आणि मराठी अशा मिश्र भाषेतून बोलतो. तर फादर जॉन इंग्रजी वळणाची मराठी भाषा वापरतो. सत्तु रामोशीच्या तोंडी ग्रामीण तर बंडू पुजाऱ्याच्या तोंडी नागर भाषाशैली दिसून येते. देवाच्या तोंडची भाषा लाचारी आणि भित्रेपणाचे दर्शन घडविणारी असून पारंपरिक वळणाची दिसून येते. तर तुकाच्या भाषेत स्वाभिमान, बेडरपणा तसेच जोरकसपणा जाणवतो. भोळे गुरुजींची भाषा त्यांच्या स्वभावासारखीच शांत व सरळ आहे. विश्वासराव खंबाटे व मंत्री यांच्या तोंडून जी भाषा दिसते. त्यातून त्यांच्या मतलबी, मस्तवाल स्वभावाची कल्पना येते. तुकाला सोडून सर्व दलित मंडळी 'व्हय जी', 'येतो जी' अशी लाचारीपणाची भाषा वापरताना दिसतात. यावरून रानगावातील दलितांची मनोवृत्ती लक्षात येते.

अशाप्रकारे 'समिधा' मधील भाषाशैलीचे दर्शन घडते. संवादाला अनुसरुन आशयानुरुप भाषा वापरण्याचा प्रयत्न लेखकाने यामध्ये केला आहे. पात्राला शोभेल अशीच भाषा लेखकाने वापरली आहे. वाक्प्रचार, म्हणी, अलंकारिक वाक्ये, तसेच ग्रामीण भाषेतील शब्द, दलितांच्या तोंडचे लाचारपणाचे शब्द यांचा वापर केल्याने वाचकाला अस्सल ग्रामीण व दलित जीवनचित्रण समोर आल्याखेरीज राहत नाही.

**समारोप :**

रणजित देसाई यांनी १९७९ मध्ये लिहिलेली 'समिधा' ही एक घटनाप्रधान कादंबरी आहे. या कादंबरीतून दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण केले आहे. ही कादंबरी दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकते. त्यामुळे ही कादंबरी दलित व ग्रामीण या दोन सीमारेषेवरील असल्याचे जाणवते.

'समिधा' या कांदबरीची वाङ्मयीन चिकित्सा करत असताना कांदबरीचे कथानक, कादंबरीतील व्यक्तिरेखा, वातावरण, भाषाशैली तसेच म्हणी, अलंकारिक वाक्ये महत्त्वाचे संवाद आणि शब्द या मुद्यांच्या आधारे अभ्यास केला आहे. यावरून असे जाणवते की, कथानक मांडत असताना लेखकाने घटनांची मांडणी विस्कळीत न होऊ देता क्रमाक्रमाने मांडल्या आहेत. त्यामुळे कथानकाला गती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

लेखकाने व्यक्तिरेखांची निर्मिती करतानादेखील अगदी विचारपूर्वक केली आहे. तुकाच्या माध्यमातून एका स्वातंत्र्योत्तर दलित तरुण पिढीचे चित्रण केले आहे. मुक्ताच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर काळातील एका सुशिक्षित दलित स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. लेखकाने व्यक्तिरेखांची निर्मिती करताना स्त्रियांची संख्या मर्यादित ठेवून पुरुष व्यक्तिरेखांमध्ये गोंधळ केल्याचे दिसून येते. तसेच देवाच्या माध्यमातून स्वातंत्र्यपूर्व जुन्या दलित पिढीचे चित्रण केले आहे. लेखकाने मुख्य व्यक्तिरेखांबरोबरच काही गौण व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. त्यामध्ये काही सत्प्रवृत्तीच्या तर काही दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केल्या आहेत.

लेखकाने घटनेला अनुसरून आशयानुरुप वातावरण निर्मिती केली आहे. पात्रांना शोभेल अशी ग्रामीण, दलित वळणाची तसेच हिन्दी इंग्रजी, मराठी

प्रमाणभाषा वापरुन कादंबरीला एक वेगळे वळण देण्याचे काम लेखकाने केले आहे. या सर्व घटकांवरून 'समिधा'चे वाङ्मयीन महत्त्व दिसून येते.

-----

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | बापट, प्र.वा.<br>गोडबोले, ना.वा. | : | 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, १९७३, पृ.क्र.३७. |
| २) | कुलकर्णी, श्री.मा. | : | 'कादंबरीची रचना', उन्मेष प्रकाशन, नागपूर, १९५६, पृ.क्र. १५. |
| ३) | नेमाडे, भालचंद्र | : | 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०, पृ.क्र. १९८. |
| ४) | जोशी, सुधा | : | 'कथा : संकल्पना आणि समीक्षा',मौज प्रकाशन, मुंबई, २०००. |
| ५) | पाटील, म.सु. | : | 'अक्षरवाटा', अमोल प्रकाशन, पुणे, १९८२, पृ.क्र. ८७, ८८. |
| ६) | फडके, ना.सी. | : | 'प्रतिभासाधन', पृ.क्र. १४४. |
| ७) | फडके, ना.सी. | : | 'उनि', पृ.क्र. २२१. |
| ८) | देसाई, रणजित | : | 'समिधा', अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, २ मार्च, १९७९, पृ.क्र. २७. |
| ९) | तत्रैव, | : | पृ.क्र. ८४. |
| १०) | तत्रैव, | : | पृ.क्र. ३४. |
| ११) | तत्रैव, | : | पृ.क्र. ८२. |
| १२) | तत्रैव, | : | पृ.क्र. १२८. |

१३) डॉ. माळी, जी.पी. : 'रणजित देसाई : जीवन आणि साहित्य', शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ८ एप्रिल, २००१, पृ.क्र. १०१.

१४) देसाई, रणजित : उनि., पृ.क्र. ९०.

१५) तत्रैव, : पृ.क्र. ९७.

१६) डॉ. माळी, जी.पी. : उनि., पृ.क्र. १०१.

१७) तत्रैव, : पृ.क्र. १०२.

१८) देसाई, रणजित : उनि., पृ.क्र. ६५.

१९) भोसले, द.ता. : 'विशाखा', एप्रिल, १९८८, पृ.क्र. ८.

२०) कुलकर्णी, मदन : 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरुप', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, १९८४, पृ.क्र. ८१.

२१) डॉ. माळी, जी.पी. : उनि., पृ.क्र. १०३.

२२) मंचरकर, र.बा. : अनुष्टुभ,जाने-फेब्रुवारी, १९९४, पृ.क्र. २४.

२३) डॉ. माळी, जी.पी. : उनि., पृ.क्र. १०३.

२४) देसाई, रणजित : उनि., पृ.क्र. १५.

२५) तत्रैव, : पृ.क्र. १०८.

२६) डॉ. माळी, जी.पी. : उनि., पृ.क्र. १०४.

-----